# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०६.०६.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०५.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०८ ईसमांवर कारवाई करून ३,६३,४८०/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०१ ईसमांवर कारवाई करून २१५/—रू. चा मुद्‌देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,९३२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,९६,४००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :— फसवणुक करणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे नविन कामठी हद्‌दीत, रमानगर, गवळीपुरा येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. कविता अजय डागोर, वय ४० वर्षे, यांना घर बांधाकामाकरीता कर्जाची आवश्यकता होती. दिनांक ०१.०६.२०२५ ते दिनांक ०५.०६.२०२६ रोजी दरम्यान, फिर्यादीची नातेवाईक आरोपी क्र. १) सरीता अजय चांडक, रा. सर्वत्र नगर, छत्रपती नगर, वर्धा रोड, नागपुर हिने फिर्यादी यांना विश्वासात घेवुन, एचडीएफसि बॅकेतुन लोन मिळवुन देते असे सांगुन, तीचे साथीदार आरोपी क्र. २) कोमल राकेश दास, रा. अनंत नगर, दिनशॉ फॅक्टरी जवळ, गिट्‌टीखदान, नागपुर ३) विजय नावाचा ईसम यांचेसोबत संगणमत करून, फिर्यादीकडुन कागदपत्रे, सिमकार्ड घेवुन तीचे बॅक अकाऊंट उघडले. व फिर्यादीचे पासबुक घेवुन, कोरे चेकवर सह्या घेतल्या. फिर्यादी यांनी बॅकेत विचारपुस केली असता, एकुण ८,९४,९४८/—रू. चे लोन मंजुर झाल्याचे तसेच, आरोपींनी त्यापैकी ७,००,०००/—रू. काढुन घेतल्याचे समजले. फिर्यादी हिने चौकशी केली असता, आरोपींनी फिर्यादीचे कागदपत्राद्वारे फिर्यादी यांना सरकारी नौकरी असल्याबाबत बनावट कागदपत्रे तयार करून, त्याद्वारे बॅकेतुन लोन मंजुर केल्याचे समजले. आरोपींनी फिर्यादीचे नावे लोन घेवुन, तीचे खात्यातुन आरटीजिएस द्वारे ७,००,०००/—रू. काढुन घेतले. आरोपींनी फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करून त्यांची आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे मपोउपनि. सृष्टी कदम ७०२०५३७६४६ यांनी आरोपींविरूध्द कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापुर :— छेडछाड करून विनयभंग करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०५.०६.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत राहणाऱ्या ३७ वर्षीय फिर्यादी यांची १२ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही तीचे आजीसोबत घराजवळील दुकानात सामान घेण्यास जात असताना, ०२ आरोपी यांनी फिर्यादीचे मुलीसोबत अश्लील व आक्षेपार्ह हावभाव करून, तीची छेडछाड केल्याने, पिडीत मुलगी घाबरून, किराणा दुकानाचे आंत गेली. आरोपी १) राजेंद्र शिवराम विश्वकर्मा, वय २२ वर्षे, २) सोनु उर्फ राज शिवराम विश्वकर्मा, वय २३ वर्षे, दोन्हीही रा. करणपुर, तह. लखनादौन, जि. शिवनी (म.प्र.) हमु.— बांधकाम साईटवर, राज टॉवर, मानकापुर, नागपुर यांनी दुकानदारासोबत वाद करून, शिवीगाळ केल्याने वस्तीतील लोक जमा झाले व त्यांनी पोलीसांना कळविल्याने पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी येवुन, दोन्हीही आरोपींना ताब्यात घेतले. आरोपी यांनी फिर्यादीचे मुलीसोबत सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन करून, तीचे कडे बघुन अश्लील व आक्षेपार्ह हावभाव करून, फिर्यादीचे मुलीचा विनयभंग केला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे सफौ. नारखेडे ९९२३०२४४२८ यांनी आरोपींविरूध्द कलम ७९, ३५२ भा.न्या.सं., सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून, दोन्हीही आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे हिंगणा :—** फिर्यादीचे भाऊ नामे अजय अरविंद हाडगे, वय ३१ वर्षे, रा. मानेवाडा, वार्ड नं. १, तह. चिमुर, जि. चंद्रपुर, हमु.— जागेश्वरपुरी, जमकेचे घरी किरायाने, हिंगणा, नागपूर हे एम.एस.ई.बि. हिंगणा आर/२, बि सी पंचवटी येथे वायरमॅन म्हणून कार्यरत आहेत. दिनांक ०४.०६.२०२६ चे ०७.०० वा. चे सुमारास, ते त्यांचे सहकर्मी सोबत ओळखी आश्रय शाळेमागील शेतामध्ये असलेल्या ईलेक्ट्रीक पोलवरील ट्रान्सफॉर्म बदलीचे काम करीत असतांना, त्यांना विजेचा धक्का लागुन ते बेशुध्द झाले. त्यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय व तेथुन शालीनीताई मेघे हॉस्पीटल येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान २०.१० वा. डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी अक्षय विजय झंजाळ, वय ३० वर्षे, रा. सोमवारी क्वॉर्टर, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोहवा. कैलास चव्हाण ९८२३१४२१५७ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** सौ. आरती कन्हैय्या शर्मा, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. २७१, श्रीकृष्ण नगर, मानेवाडा, बेसा रोड, संजय कोहळे चे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपूर ह्या दिनांक २९.०५.२०२६ चे १०.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील मानेवाडा चौक येथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— कत्थ्या रंगाचा सलवार सुट व कत्थ्या रंगाची लॅगीन घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतात.

**२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** कु. मानसी राजेश ठाकरे, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. ३७, साई नगर ०२, हुडकेश्वर, नागपुर ही दिनांक ०१.०६.२०२६ चे ०५.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट १ इंच, केस— काळे लांब,

अंगात– गुलाबी रंगाचा टॉप व निळ्या रंगाचा जिन्स तसेच निळ्या रंगाचा दुपट्टा व पायात गुलाबी रंगाचा जुता घातलेले असुन सोबत गुलाबी रंगाची बॅग आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे अंबाझरी :–** श्रीमती एतपरियाबाई सुखराम कश्यप, वय ३८ वर्षे, रा. पालीवाल मेस, गोकुलपेठ, अंबाझरी, नागपूर ह्या दिनांक ०७.०५.२०२६ चे ०७.३० वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीतील राहते घरून मध्यप्रदेश येथे आईकडे जाते असे सांगुन निघुन गेल्या. आईकडे गेल्या नाही तसेच, राहते घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, उंची– ६ फुट ६ इंच, केस– काळे पांढरे लांब, अंगात– भगव्या रंगाचा सलवार सुट व पायात काळ्या रंगाची स्लीपर चप्पल घातलेले आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.


सौ. आरती


मानसी


एतपरियाबाई

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**